# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 06 October 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०६ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेत ८०० लाभार्थी भाविकांची पहिली विशेष रेल्वे आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास आयोध्येकडं श्री राममंदिर दर्शनासाठी रवाना झाली आहे. रेल्वेस्थानकावर पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी रेल्वेला हिरवी झेंडी दाखवली. आज आयोध्येला पहिली विशेष रेल्वे सोडण्यात आली. यापुढं चारधाम, बौद्धगया, अजमेर अशा विविध धार्मिक स्थळांच्या भेटीला ६० वर्षांवरील नागरिकांना या योजनेतुन संधी मिळणार आहे. ही योजना सर्वधर्मीयांसाठी असल्याचं यावेळी पालकमंत्री सत्तार म्हणाले. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांची उपस्थितीत होती.

****

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा तासाभरात छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य पोलिस पाटील संघटनेच्या राज्यस्तरीय मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम दुपारी ४ वाजता हर्सुल सावंगी परिसरात आयोजित करण्यात आलं आहे.

****

मुंबईच्या चेंबुर परिसरातल्या सिध्दार्थ नगर भागात दुमजली इमारतीस लागलेल्या आगित एकाच कुटुंबातील तीन लहान मुलांसह सात जणांचा मृत्यु झाला. आज

पहाटे सव्वा पाचच्या सुमारास ही दुर्घटना झाली. इमारतीच्या तळमजल्यावरील दुकानात शॉर्ट सर्कीट होवून आग लागली आणि ती हे कुटुंब राहात असलेल्या वरच्या मजल्यापर्यंत पसरली. आग आटोक्यात आणताना, दुर्घटनाग्रस्त सर्वांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, मात्र सर्वांना मृत घोषित करण्यात आलं.

****

कमी अंतराचा पल्ला असलेली हवाई सुरक्षा प्रणाली–व्हेरी शॉर्ट रेन्ज एअर डीफेन्स सिस्टीमची चाचणी यशस्वीरित्या पार पडली आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था – डी .आर.डी.ओ.तर्फे निर्मित हे चौथ्या पिढीतील  क्षेपणास्त्र आहे. राजस्थानच्या पोखरण भागात यासाठी मागील दोन दिवसांत तीन परिक्षणं घेण्यात आली. खुप उंचावरील आणि वेगानं या क्षेपणास्त्रांनी लक्ष्याचा अचुक भेद केला आणि याच्या मारक क्षमतेची खातरजमा करण्यात आली. यामुळे  संरक्षण दलांना हवाई धोक्यांचा निपटारा करण्यास बळकटी प्राप्त झाल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

****

वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथल्या संत सेवालाल संस्थानचे पहिले अध्यक्ष तथा या धर्मपिठाचे महंत संत सेवालाल महाराजांचे चौथे वंशज, नामदेव हंजारी महाराज यांचं काल पहाटे निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते.

बंजारा समाज बांधवांसाठी महत्वाचं तिर्थस्थान असणाऱ्या पोहरादेवी इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काल पूर्वनियोजीत दौरा होता. त्यावेळी याठिकाणच्या विविध विकास कामांचं उद्घाटन– पायाभरणी, बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटन तसंच जगदंबा देवीसह संत सेवालाल महाराज मंदीराचं दर्शन असा कार्यक्रम पार पडला. या कारणामुळेच ही दु:खद माहिती काल जाहिरपणे कळवण्यात आली नाव्हती.

****

लातुर शहरातील पुरनमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील वसतिगृहात राहणाऱ्या ६०  विद्यार्थिंनाना काल रात्री जेवण केल्यानंतर विषबाधा झाल्याचा प्रकार घडला आहे. बाधित विद्यार्थ्यांना विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अधिष्ठाता डॉ. उदय मोहित यांनी विद्यार्थिंनींच्या प्रकृतीमध्ये वेगात सुधारणा होत असल्याचं आज सांगितले. पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला असून, अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. घटनेची माहिती मिळाल्यानंतर खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर यांनी विद्यार्थिनींची भेट घेतली.

****

नांदेड जिल्ह्यास अतिवृष्टीमुळे झालेल्या  नुकसानीपोटी  ८१२ कोटी रुपयांच्या अपेक्षित नुकसानभरपाईच्या मागणीचा प्रस्ताव छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आला आहे. नांदेड जिल्हयात एक ते तीन सप्टेंबर,२०२४ दरम्यान  ६२ मंडळात अतिवृष्टी होवून शेतीपीक -शेतजमीनीचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला.ग्रामस्तरीय समितीमार्फत सदर नुकसानीचे संयुक्त पंचनामेही पुर्ण झाले. दरम्यान,राज्य शासनाकडून प्राप्त मान्यतेनुसार पीक नुकसान अनुदान वाटपाचे दर वाढविण्यात आले, तसंच अनुदान वाटपातील क्षेत्राची मर्यादा दोन वरुन तीन हेक्टरपर्यंत करण्यात आली. त्यानुसार सदर निधी मागणीचा प्रस्ताव दाखल झाला आहे.

****

संयुक्त अरब अमिरातीमध्ये  सुरु असलेल्या महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत - पाकिस्तान लढत होणार आहे. साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल. तसंच, भारत-बांगलादेश पुरुषांच्या तीन टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज सायंकाळी सात वाजता ग्वाल्हेर इथं खेळला जाणार आहे.

****